आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 04.11.2026 **वार : बुधवार**

ठळक बातम्या

1. पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला नवी गती मिळेल; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास.
2. केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी संवेदनशीलतेनं उभं असल्याची पंतप्रधानांची ग्वाही.
3. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचा प्रारंभ आणि लोकार्पण.
4. 41व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेचा समारोप, मुलींच्या गटात तामिळनाडू तर मुलांच्या गटात उत्तर प्रदेश संघाला विजेतेपद.

सविस्तर बातम्या

पुणे मेट्रो

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला नवी गती मिळेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रोच्या तिसऱ्या मार्गिकेचं उद्घाटन आणि पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातल्या कामांचं भूमिपूजन काल पंतप्रधानांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून केलं, त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान म्हणाले...

पुणे के मेरे प्यारे भाई और बहनों, दिवाली अगदी जवळ आली आहे. सर्वप्रथम तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा. अब हिंजवडी से शिवाजीनगर के बीच मेट्रो शुरू होने से पुणे के एक बड़े आईटी हब को बेहतर कनेक्टिविटी मिलेगी। आज जिस नई लाइन पर काम शुरू हुआ है, उससे पुणे के पुराने और नये इलाकों के बीच कनेक्टिविटी और मजबूत होगी। पुणे मेट्रो का जितना विस्तार हो रहा है, उससे समय भी बच रहा है और पुणे वासियों को जादा सुविधा भी मिल रही है। और हम सब जानते हैं जब शहर का समय बचता है, तो शहर की प्रोडक्टिविटी बढ़ती है। जब शहर की प्रोडक्टिविटी बढ़ती है, तो देश की इकोनॉमी को गति मिलती है। और जब इकोनॉमी बढ़ती है, तो गरीब और मिडल क्लास दोनों को उसका फायदा होता है।

प्रतिकूल हवामानामुळे अडचणीत आलेल्या राज्यातल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार संवेदनशीलतेनं उभं असल्याची ग्वाही, पंतप्रधानांनी दिली. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, संकटाच्या काळात सरकार त्यांना मदत करेल. दिवाळीच्या सणात दुष्काळग्रस्त आणि संकटात असलेल्या शेतकरी कुटुंबांचा विचार करून त्यांच्या घरातही सणाचा आनंद निर्माण होण्यासाठी सर्वांनी सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे आमदार, खासदार आणि महापौर या कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित होते.

हिंजवडी आणि आसपासचा परिसर देशातलं महत्त्वाचं आयटी हब असल्याचं सांगून मुख्यमंत्री म्हणाले...

मला विश्वास आहे की पुणेकरांना या लाईनचा खूप फायदा होईल. यामध्ये अनेक विशेषता आहेत. जवळपास पुण्यामध्ये आपली जी मेट्रोची फेज-2 आहे त्या 4 मार्गिकांचं आज भूमिपूजन केलं आहे. त्यामुळे पुण्याच्या सर्व दिशांना मोठ्या प्रमाणात कनेक्टिविटी उपलब्ध होणार आहे. आणि एकूण या सगळ्या लाईन पूर्ण झाल्यानंतर 120 किलोमीटरचं नेटवर्क मेट्रोचं पुण्यामध्ये तयार होणार आहे.

मेट्रो-3 हा पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला कलाटणी देणारा प्रकल्प ठरेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

हि मेट्रोसेवा पूर्णपणे महिलांकडून संचालित केली जाणारी देशातली पहिली मेट्रो ठरणार असून, 100 महिला रेल्वे चालक आणि स्थानकांवरच्या 50 टक्के महिला कर्मचारी या मार्गिकेचं संचालन करणार आहेत, हे अभिमानास्पद असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या.

पुण्याच्या भविष्यातल्या वाहतूक गरजा लक्षात घेऊन मेट्रो विस्तारासोबतच अन्य पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जात असल्याचं केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी सांगितलं.

सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर विकसित करण्यात आलेला हा देशातला पहिला मेट्रो प्रकल्प असून आजपासून या मार्गिकेवर व्यावसायिक प्रवासी सेवा सुरू होणार आहे. गर्दीच्या वेळी दर 6 मिनिटांनी, तर इतर वेळी दर 12 मिनिटांनी मेट्रो उपलब्ध असेल.

या कार्यक्रमात पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातल्या वनाज ते चांदणी चौक, रामवाडी ते विठ्ठलवाडी, खराडी ते खडकवासला आणि नळस्टॉप ते माणिकबाग या 4 नवीन मार्गिकांची पायाभरणी देखील पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं करण्यात आली.

<u>मुख्यमंत्री-मेट्रो प्रवास</u>

पुणे मेट्रोच्या नव्या मार्गाचं उद्घाटन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह बालेवाडी ते हिंजवडी फेज-2 पर्यंत मेट्रोमधून प्रवास केला. प्रवासादरम्यान मुख्यमंत्र्यांनी शाळकरी विद्यार्थिनी आणि आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

<u>मुख्यमंत्री फडणवीस</u>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचा प्रारंभ आणि लोकार्पण करण्यात आलं. युवाशक्तीला दिशा आणि शक्ती देण्यासाठी घर, परिसर, गाव, जिल्हा आणि राज्य

अंमली पदार्थमुक्त करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. देशाच्या निर्मितीत महत्वाचं योगदान असलेल्या, नवोपक्रमात पुढे असलेल्या-युवा पिढीला-अंमली पदार्थांपासून वाचवण्यासाठी प्रत्येकाला या अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत सहभाग घ्यावा लागेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

डायल 112 मुळे पोलिसांच्या प्रतिसादाची वेळ 3 मिनिटावर आली आहे आणि पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालय याबाबतीत राज्यात प्रथम क्रमांकावर आहे अशी माहिती त्यांनी दिली. पोलिसांसाठीच्या निवासस्थानाचा पारंपरिक आराखडा बदलून सर्व सोईं असलेल्या चांगल्या घरांची निर्मिती करण्यात येत आहे, असं फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी

आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी' संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. सामाजिक सहभागातून अधिक संसाधनं उभारून-गरजू रुग्ण आणि आपत्तीग्रस्त नागरिकांपर्यंत मदत पोहोचवण्याचा संस्थेचा उद्देश आहे. या नव्या व्यवस्थेमुळे गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया आणि उपचारांसाठी विशेष मदत उभारता येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

टीबी मुक्त महाराष्ट्र

क्षयरोगमुक्त महाराष्ट्राचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी 'टून्यॅट क्वात्रा' ही अत्याधुनिक क्षयरोग निदान यंत्रं-विविध आरोग्य केंद्रांमध्ये बसवण्यात येणार असून ती हाताळण्यासाठी कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येईल.

ह्या यंत्राद्वारे एका तासात क्षयरोगासह रिफॅम्पिसिन-प्रतिरोधक क्षयरोगाचंही निदान करता येणार आहे. निदानातील विलंब कमी झाल्यामुळे संसर्गाचा प्रसार रोखण्यास मदत होईल तसंच ग्रामीण आणि वंचित भागांतल्या नागरिकांना सुलभ आणि आधुनिक आरोग्यसेवा मिळेल. ग्रामीण भागातील लोकांना सोपी आणि जलद आधुनिक आरोग्यसेवा देणं हेच शासनाचं प्रमुख उदिष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, सार्वजनिक आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी 1440 वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी दिली. या डॉक्टरांना आज नियुक्ती आदेश वितरित करण्यात येणार आहेत. या नियुक्त्यांमुळे सरकारी रुग्णालयांमधील डॉक्टरांची कमतरता दूर होऊन ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होईल असं आबिटकर यांनी सांगितलं.

दुष्काळ मदत

राज्यातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये 5 हजार रुपयांचा हप्ता जमा करण्यात आला असल्याची माहिती भाजप नेते परिणय फुके यांनी काल नागपूर इथे पत्रकार परिषदेत दिली.

दिया मिर्झा

अभिनेत्री दिया मिर्झा हिची फटाकेविरहित दिवाळीचा संदेश देणारी ध्वनीचित्रफीत समाजमाध्यमावर पुन्हा प्रदर्शित करायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत. त्याचबरोबर

पर्यावरणपूरक दिवाळी मोहिमेवरून निर्माण झालेल्या वादावर तीव्र आक्षेप घेत न्यायालयानं जातीय रंग देणाऱ्या राजकीय नेत्यांबद्दलही नाराजी व्यक्त केली आहे.

बास्केट बॉल

पुण्यात म्हाळुंगे बालेवाडी इथे आयोजित 41व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेचा समारोप काल झाला. मुलींच्या गटात तामिळनाडूच्या संघानं तर मुलांच्या गटात उत्तर प्रदेशच्या संघानं विजेतेपद पटकावलं.

स्पर्धेतील विजेत्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. 'खेलो इंडिया'च्या माध्यमातून ग्रामीण भागातल्या गावागावांत खेळ पोहोचला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातल्या खेळाडूंनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यांची मालिका आज सुरू होत आहे. आज पहिला सामना ऑकलंड इथे थोड्याच वेळात सुरू होणार आहे. पुढील वर्षी होणाऱ्या विश्वकरंडक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीनं ही मालिका दोन्ही संघांसाठी महत्त्वाची आहे.

हवामान

कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात काल तुरळक ठिकाणी पाऊस झाला. आज कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.